# भीक देऊन परावलंबी करण्यापेक्षा मदत करुन स्वावलंबी बनवा

## डॉ. अभिजित सोनावणे : हिंदू महिला सभेतर्फे पूजा घनसरवाड यांचा दुर्गा पुरस्काराने गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'आयुष्यात कोणालाही भीक देऊ नका; पण मदत मात्र नक्की करा. भीक देणे म्हणजे समोरच्याला आपल्यावर अवलंबी करणे व मदत करणे म्हणजे स्वावलंबी बनविणे. भीक देणे बंद केले, तरच ते पोटापाण्यासाठी पर्याय शोधतील. म्हणूनच भीक देऊन परावलंबी करण्यापेक्षा मदत करून स्वावलंबी बनवा, असे आवाहन सोहम् ट्रस्टचे डॉ. अभिजित सोनावणे यांनी केले.

हिंदू महिला सभेच्या वतीने आयोजित नवरात्र महोत्सवात तिसऱ्या दुर्गा पुरस्काराने स्मशानात जळणाऱ्या चितेच्या प्रकाशात अभ्यास करुन दहावीत घवघवीत यश पटकावणाऱ्या पूजा घनसरवाड यांचा गौरव करण्यात आला. सोनावणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या वेळी हिंदू महिला सभेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले, सोनावणे यांच्या पत्नी डॉ. मनीषा सोनावणे, रोहिणी नामजोशी पांढरे, कथाकथनकार वसुधा मेहंदळे आदी उपस्थित होते. या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून त्यात शहीद जवानांच्या तीन मुलींचे कुमारिकापूजन केले.

- पूजा घनसरवाड म्हणाल्या, "माझे कुटुंब स्मशानात प्रेताच्या अंत्यविधीसाठी आलेल्यांना लाकूड, पाणी आदी वस्तू पुरवण्याचे काम करते. आई-वडील अशिक्षित आहेत. वडिलांना थोडी अक्षरओळख असण्याने त्यांची आम्हा मुलांना शिकवून मोठे करण्याची दृढ इच्छा होती.
- पालक शिक्षित नसले, तरी संस्कार, संस्कृती जपण्यास त्यांनी आम्हाला शिकवले. आई सुया, फुगे, पिना विकायची. शाळेतील मुले चिडवायची. पण मला लाज वाटायची नाही; कारण आम्ही मेहनतीचे खात होतो. आमच्या समाजात कोणी शिकत नाही; पण आम्हा पाचही भावंडांना शिकवत आहेत. परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय आहे."

MI 4A Pro 43 (108cm) LED TV ELA4223IN
2 Year Warranty